ग्रामपंचायत निवडणुकांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय मतदार यादीमधील चुका दुरुस्त करणेबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ सप्टेंबर, २०१७

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम-१२ मधील तरतुदीनुसार राज्यातील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासंदर्भातील अधिक्षण, संचालन व नियंत्रण व त्या सर्व निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.

२. आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम-१२ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायत निवडणुकांसाठी, राज्य निवडणूक आयोग याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करेल, त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी प्रभागनिहाय विभागून व अधिप्रमाणित करुन वापरावयाची आहे.

३. आणि ज्याअर्थी; वरील तरतुदीप्रमाणे मतदार यादी तयार करताना, विधानसभेच्या मतदार यादीनुसार, काही मतदारांची नावे ज्या प्रभागामध्ये समाविष्ठ असणे आवश्यक आहे, त्या ऐवजी त्या मतदारांची नावे अन्य प्रभागामध्ये चुकीने समाविष्ठ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ग्रामपंचायत क्षेत्रासाठी राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीत नाव असून देखील प्रभागनिहाय मतदार यादी विभागून अधिप्रमाणित करताना, काही मतदारांची नावे कोणत्याही प्रभागामध्ये समाविष्ट करण्याचे राहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. त्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम-१२ तसेच यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(i) हे आदेश राज्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी लागू राहतील.

(ii) विधानसभा मतदार यादीवरुन ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रभागनिहाय तयार करण्यात आलेली मतदार यादी अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्यानंतर काही मतदारांची नावे ज्या प्रभागात असणे आवश्यक आहे, त्याऐवजी अन्य प्रभागाच्या मतदार यादीत चुकीने समाविष्ट करण्यात आलेली असल्यास अथवा राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस संबंधित निवडणूक क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असून देखील त्यांची नावे ग्रामपंचायत निवडणुकांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करावयाचे राहून गेली आहेत असे निदर्शनास आल्यास, मतदार यादी अधिप्रमाणित करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात.

(iii) वरील स्वरुपाच्या दुरुस्त्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचे नामनिर्देशनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करता येतील. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, मतदार यादीत नवीन नावे समाविष्ठ करणे अथवा वगळण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,

Anawade 28/9/17

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)
२) सर्व निवडणूक कार्यासने, राज्य निवडणूक आयोग.
३) निवड नस्ती.